



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक ६९, मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# सभापतीपदासाठी बेलकर, रासकर स्पर्धेत!

## ■ उपसभापतीपदासाठी सुपेकर, पवार यांच्या नावाची चर्चा ■ बाजार समिती पदाधिकाऱ्यांच्या निवडी

पारनेर : प्रतिनिधी

**कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापती, उपसभापतीपदाच्या निवडीमध्ये माजी सभापती गंगाराम बेलकर व किसनराव रासकर यांची नावे स्पर्धेत आहेत. उपसभापतीपदासाठी ज्येष्ठ शिवसैनिक किसनराव सुपेकर व विजय पवार यांची नावे चर्चेत आहेत. अनुभव तसेच मागील निवडीप्रसंगी बेलकर यांची संधी हुकल्याने बेलकर हे सभापतीपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. तर निष्ठावान शिवसैनिक म्हणून किसनराव सुपेकर यांना संधी मिळेल अशी चिन्हे आहेत.**

बाजार समितीच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये खासदार नीलेश लंके, मा. आ. विजयराव औटी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने शत प्रतिशत यश मिळविले. विरोधकांना एकही जागा न मिळाल्याने पदाधिकारी निवडी बिनविरोध झाल्या. निवडीनंतर प्रत्येकी एक वर्षाची संधी देण्याचा निर्णय त्यावेळी झाला होता. मात्र लोकसभा, विधानसभा निवडणूकीमुळे पदाधिकारी बदलास विलंब झाला. दोन्ही निवडणूका झाल्यानंतर आता विद्यमान सभापती बाबाजी तरटे व उपसभापती बापू शिर्के यांनी खासदार नीलेश लंके यांच्या सुचनेनुसार दोन्ही पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले. पारनेर येथील संपर्क कार्यालयात बैठक होऊन लंके यांच्या सुचनेनुसार दोन्ही पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी राजीनामे दिले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडून अजित पवार गटामध्ये अशोक सावंत व प्रशांत गायकवाड हे खासदार नीलेश लंके यांच्यापासून दूर गेले आहेत. तर विजय औटी समर्थक डॉ. पद्मजा पठारे, शंकर नगरे हे वेगळा निर्णय घेण्याच्या विचारात असल्याची माहीती आहे. तर बाबासाहेब नऱ्हे हे मा. आ. विजय औटी यांचा शब्द डावलणार नाहीत.









### प्रशांत गायकवाड काय भूमिका घेणार ?

सहकार क्षेत्रात सबाजी गायकवाड, प्रशांत गायकवाड हे नेहमीच चमत्कार करतात. यावेळच्या पदाधिकारी निवडीमध्ये प्रशांत गायकवाड किंवा सबाजी गायकवाड काय चमत्कार घडविणार याकडे तालुक्याचे लक्ष आहे. दरम्यान, यासंदर्भात प्रशांत गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता मला रस नाही अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. जिल्हा बँक भरतीमधील वादामुळे गायकवाड कुटूंबीय या वादात पडणार नाहीत अशी माहीती गायकवाड समर्थकांकडून देण्यात आली.

### बेलकर, सुपेकर पदाधिकारी होणार

मागील निवडीमध्ये गंगाराम बेलकर यांना डावलल्यामुळे यावेळी त्यांना सभापती पदाची संधी मिळेल अशी माहीती आहे, तर लोकसभा निवडणूकीदरम्यान खा. नीलेश लंके यांनी माझे सहकारी किसनराव सुपेकर यांना संधी देणार असल्याचे सुतोवाच केले होते. खा. लंके हे बेलकर व सुपेकर यांना संधी देणार हे निश्चित आहे.

# दोन दिवसांत मार्ग काढा, हात जोडून सांगतो !

छ.संभाजीनगर : प्रतिनिधी



**मराठा आरक्षणसाठी राज्यात ३ तरुणांनी आत्महत्या केली होती. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना आत्महत्या न करण्याची विनंती केली. न मिळणारे आरक्षण आपल्याला मिळत आहे. मला राज्यात कुणाची नाही, पण तुमची फार गरज आहे. मी तुमच्या पाया पडतो, तुम्ही आत्महत्या करू नका, असे मनोज जरांगे म्हणाले. एका टक्क्यावरून हुकले, तर हुकू द्या. धाडसी बना. एक दोन वर्ष रिपीट करा, पण आपल्या आई-बापापासून लांब जाऊ नका. आपल्या आई-बापाला दुसरा कोणाचा आधार नाही, असेही ते म्हणाले.**

मराठा आरक्षणावर दोन दिवसांवर मार्ग काढा, तुम्हाला हात जोडतो. अन्यथा आम्हाला आंदोलन अधिक तीव्र करावे लागले, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी बीड, बदनापूर आणि सिल्लोड येथे मराठा समाजबांधवांनी आत्महत्या केली होती. यावरून मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना आत्महत्या न करण्याची विनंती केली.

**उशीर होऊ द्या, पण तुम्ही संपू नका**

मनोज जरांगे म्हणाले, यावेळेस आरक्षण हुकले, हा तुमचा दोष नाही. तुमचे आई-वडील तुम्हाला कष्ट करून पैसे पुरवतात. नोकरी लागण्याचे तुम्ही स्वप्न बघितलेले असते. दुसरा कमी गुण असून नोकरीला लागला. पण तुम्हाला मार्क असून तुम्ही लागला नाहीत. तुमची भावना योग्य आहे. पण नाईलाज आहे. एक-दोन वर्ष उशिर होऊ द्या. काही फरक पडत नाहीत. तुम्ही कायमचे संपू नका.

संयम सुटला तर वेगळे आंदोलन करावे लागले मनोज जरांगे यांनी पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर उर्वरीत पान ३ वर

# पृथ्वीराज मोहोळ ६७ वा महाराष्ट्र केसरी

## ■ अंतिम लढतीत महेंद्र गायकवाड पराभूत ■ शिवराज राक्षेसह गायकवाड ३ वर्ष निलंबित



अहिल्यानगर : प्रतिनिधी

**अहिल्यानगर येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत गादी विभागाच्या लढतीत पृथ्वीराज मोहोळ विजयी झाला आहे. पृथ्वीराज मोहोळ हा ६७ वा महाराष्ट्र केसरी बनला आहे. पृथ्वीराज मोहोळ आणि महेंद्र गायकवाड यांच्यात सामना चांगलाच रंगला होता. तसेच याआधी मोठा गोंधळ देखील झाला होता. गोंधळानंतर अंतिम लढत सुरू करण्यात आली होती.** यावेळी पहिल्या फेरीपासूनच पृथ्वीराज मोहोळ आघाडीवर होता. महेंद्र गायकवाड याने मैदान सोडले आणि पृथ्वीराज मोहोळ विजयी घोषित झाला. या विजयानंतर पृथ्वीराज मोहोळ याने पत्रकारांशी संवाद साधला. पृथ्वीराज मोहोळ म्हणाला, माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. माझे स्वप्न उर्वरीत पान ३ वर


## दुहेरी हत्याकांडाने शिर्डी हादरली !

# साई संस्थानच्या दोन कर्मचाऱ्यांची हत्या

## कायदा, सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाल्याची चर्चा मोफत अन्नछत्रामुळे गुन्हेगारी वाढली : डॉ.विखे

शिर्डी : प्रतिनिधी

**दुहेरी हत्याकांडाने शिर्डीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी तिघा जणांवर प्राणघातक हल्ले करण्यात आले. धक्कादायक म्हणजे मृतांमध्ये शिर्डीच्या साई संस्थानच्या दोघा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सुभाष घोडे आणि नितीन शेजुळ अशी मृतांची नावे आहेत.**





साई संस्थानचे दोघे कर्मचारी आणि शिर्डीतील एका तरुणावर ड्युटीला येताना प्राणघातक हल्ला करण्यात आला. तीन वेगवेगळ्या ठिकाणी तिघांवर चाकूने वार करण्यात आले. यापैकी साई संस्थानच्या दोघा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे, तर कृष्णा देहरकर नावाचा तरुण गंभीर जखमी अवस्थेत आहे.

दोघे साई संस्थान कर्मचारी पहाटे ड्युटीला येत असताना या घटना घडल्या. पहाटेच्या सुमारास ड्युटीवर जाताना तिघांवर अज्ञातांकडून चाकूने वार करण्यात आले. तीन वेगवेगळ्या ठिकाणी तिघांवर वार झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. साई संस्थानच्याच दोघा कर्मचाऱ्यांची एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी हत्या होणं हा योगायोग आहे की यामागे काही कारण आहे, हे अद्याप अस्पष्ट आहे.

दरम्यान, शिर्डीत एकाच रात्रीत तिघांवर चाकूने वार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. शिर्डीत कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे उडाल्याची चर्चा होत आहे. पोलीस प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### कोणावर हल्ला ?

१)सुभाष साहेबराव घोडे, साई संस्थान कर्मचारी, घटना घडली कर्डोबा नगर चौक

२) नितीन कुष्णा शेजुळ, साई संस्थान कर्मचारी, घटना घडली साकुरी शिव

३) गंभीर जखमी – कृष्णा देहरकर रा. श्रीकृष्णानगर यांच्यावर उपचार सुरू

### मोफत अन्नछत्रामुळे गुन्हेगारी वाढली

तीन वेगवेगळ्या ठिकाणी घटना घडल्या आहेत, पहाटे चार वाजताच्या सुमारास घटना घडल्याने फार लोक जागे नव्हते. दोघांचे मृतदेह वेगवेगळ्या ठिकाणी आढळले आहेत, तर तिसऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोफत अन्नछत्र, मोफत शिर्डी करून ठेवली आहे, त्यामुळे गुन्हेगारी वाढली आहे. पुन्हा एकदा हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. आम्ही जे बोललो होतो, ते कोणत्या उद्देशाने बोललो होतो ते महाराष्ट्राला कळेल,हे ठरवून केलेले मर्डर वाटत नाहीत नशेमध्ये होत असलेले रँडम मर्डर आहेत. व्हाईटनरची नशा करतात ती ही मुलं असावीत. वेगवेगळ्या लोकेशनला जो सापडला त्याच्यावर हल्ला करुन त्याच्याकडून पैसे काढण्याचं हे कृत्य आहे. यात जातपातीचा विषय नाही. हे नशेखोरांचे कृत्य आहे. दुपारपर्यंत हे आरोपी ताब्यात असतील. साडेपाचला पोलिस कर्मचाऱ्यांना फोन केला, त्या कर्मचाऱ्याने तो अपघात असल्याचं सांगितलं, त्याला सस्पेंड केलं जाईल. त्याला मर्डर आणि अपघातातला फरक कळत नाही. सीसीटीव्ही तपासू, ज्या पोलिसांनी हलगर्जीपणा केला त्यांच्यावर कारवाई होईल.

डॉ.सुजय विखे
माजी खासदार





# REQUIRE TEACHERS

STATE & CBSE CURRICULUM

## 11TH/12TH SCIENCE & COMMERCE

| Sr.No. | Post | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|---|
| 01 | Principal | Physics / Chemistry Biology / Math's | M.Sc./ B.Ed. | 01 |
| 02 | Asst. Professor | Physics | M.Sc. / B.Ed. | 01 |
| 03 | Asst. Professor | Math's | M.sc/ B.Ed. | 01 |
| 04 | Asst. Professor | Chemistry | M.Sc. B.Ed. | 01 |
| 05 | Asst. Professor | Biology | M.Sc. B.Ed. | 01 |
| 06 | Asst. Professor | IT / Computer Teacher | B.E. comp/ M.CS/ MCA | 01 |
| 07 | Asst. Professor | Marathi | M.A.,/ B.Ed | 01 |
| 08 | Asst. Professor | English | M.A.,/ B.Ed | 01 |
| 09 | Asst. Professor | Geog./ Economics | M.A.,/ B.Ed | 01 |
| 10 | Asst. Professor | Accountancy | M.Com /B.Ed. | 01 |
| 11 | Asst. Professor | OC | M.Com /B.Ed. | 01 |
| 12 | Asst. Professor | SP | M.Com /B.Ed. | 01 |

walk in interview

Walk – in Interview with all original documents on Saturday 8th Feb. 2025 between 10.00 AM to 2.00 PM at given Address

We are looking for Passionate, experienced , innovative and qualified teachers with good communication skills and fluency in English for 11th to 12th Classes.

Note: *Salary commensurate based on Skill, qualification and Experience.
* Bus Facility / transport allowance will be provided.

SANSKAR PRATISHTHAN'S
DBM SCHOOL & JUNIOR COLLEGE
Ralegan Siddhi, Tal: Parner, Dist. A.Nagar.
9422 75 5191 | 7083 75 8198



फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

## राहा टिपटॉप!

**इमेज बनवणं फक्त सेलिब्रिटीजसाठीच गरजेचं असतं, असं नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची एक सकारात्मक प्रतिमा असायलाच हवी. स्मार्ट ड्रेसिंग तुम्हाला तुमची इमेज विकसित करायला हातभार लावेल.**

कोणतेही यूथ आयकॉन पाहिलेत तर तुमच्या लक्षात येईल की त्यांच्या इमेज मेकिंगमध्ये त्यांचे कठोर परिश्रम आणि यशाबरोबरच त्याच्या ड्रेसिंग स्टाइलचं मोठं योगदान असतं. इमेज बनवणं फक्त सेलिब्रिटीजसाठीच गरजेचं असतं, असं नाही. प्रत्येक व्यक्तीला स्वतःची एक सकारात्मक प्रतिमा असायलाच हवी. तुमच्या परिसरातील व्यक्ती तुमच्याशी कशा वागतात, कशा प्रकारे संवाद साधतात, याचा थेट संबंध तुमच्या इमेजशी आहे. पेहरावात आपल्या कपड्यांबरोबरच, ॲक्सेसरीजचाही (आभूषणं, घड्याळ आदी) विचार करायला लागतो. म्हणजेच स्मार्ट ड्रेसिंग हे फक्त कपड्यापुरतं मर्यादित नसून, आपल्या ओव्हर ऑल लूकशी संबंधित आहे. महागडे कपडे




घालणं किंवा एखाद्या चित्रपटात एखाद्या नायिकेने घातलेल्या कपड्यांची नक्कल करणं म्हणजे स्टायलिश दिसणं नाही. रिझनेबल पैसे खर्च करून आणि आपल्याला काय शोभेल, याचं भान ठेवून कपड्याचं सिलेक्शन करणं जास्त सेन्सिबल आहे. कूल दिसण्याच्या नादात बालिश दिसत नाही ना याची काळजी घ्या. आपल्या कपड्यांची स्वच्छता, इस्त्री याकडे बारकाईनं लक्ष ठेवायला हवं. काही कपडे धूळ आणि तत्सम गोष्टी पटकन खेचून घेतात. यासाठी असे कपडे व्यवस्थित आणि नीटनेटके दिसायला कपड्यांवरील डस्ट साफ करणारा ब्रश वॉर्डरोबमध्ये ठेवणं श्रेयस्कर. शिवाय देश तसा वेश हा नियम लक्षात ठेवा.

## काय हरकत आहे?



**लग्नासाठी वय आणि रुपाइतकाच महत्त्वाचा मुद्दा असतो, मुलाचा पगार. तो जर मुलीपेक्षा कमी असेल तर लग्नाची ती गोष्ट कधीच पुढे सरकायची नाही. पण आता हा ट्रेंड बदलतोय. स्वतःपेक्षा कमी पगार असलेल्या मुलांनाही मुली सहज होकार देताहेत...**

मुलींचं शिक्षण हे अलीकडे मुलांच्या बरोबरीनंच होतं. उच्च शिक्षणानंतर स्वाभाविकपणे मुलींच्या चांगल्या नोकरीच्या



अपेक्षाही वाढतात. त्याचप्रमाणे उत्तम पगार असावा आणि स्वतःची कमाई बक्कळ असावी, हा मोह कुणाला होत नाही? आपली शैक्षणिक पात्रता, बौद्धिक कुवत, संभाषण कौशल्य आणि स्मार्टनेस यांसारख्या गुणांवर आपल्याला उत्तम पगाराची नोकरी मिळावी, हा विचार चुकीचा म्हणता येणारंच नाही. काही दिवसांपूर्वी याच कारणामुळे मुलींची लग्न होत नाहीत, असं एक चित्र होतं. इतका भरमसाठ पगार असणारी आणि एवढी शिकलेली मुलगी नको अशा विचारांमुळे मुलींना नकार येत होते. हळूहळू चित्र बदललं, माझाच पगार काही लाखांच्या घरात आहे, तर त्यापेक्षा कमी पगार असलेल्या मुलाशी मी का लग्न करू? या प्रश्नामुळे मुलांना मुलींकडून नकार येऊ लागले. सामाजिक परिस्थितीत लग्नाच्या बाबतीत ही आंदोलनं सुरू असतानाच सुवर्णमध्य काढण्याचे अनेकांचे प्रयत्न सुरूच होते. त्यात लग्नाच्या वयाच्या मुली- मुलं यांच्याप्रमाणेच त्यांचे पालक, नातेवाइक, वधू-वर सूचक मंडळं, मॅरेज कौन्सेलर ही मंडळीही होतीच. या परिस्थितीत बरीचशी सुधारणा होऊन आता आपल्यापेक्षा कमी पगार असलेल्या मुलाशी लग्न करायला मुली तयार होऊ लागल्या आहेत. अखेर, संपूर्ण कुटुंबासाठीच खर्च करायचा, तर जोडीदारापैकी कुणाही एकाला जास्त पगार असलेला पुरेसा आहे, असा समजूतदारपणे केलेला विचार त्यात दिसू लागला आहे. अर्थात, याचं प्रमाण लव्ह मॅरेजमध्येच जास्त आहे. तरीही ठरवून लग्न करतानाही अगदीच लग्न न ठरण्यापेक्षा मुलाचा पगार कमी असला, तरी चालेल, ही भूमिका मुली घेताना दिसतात.

## मोठं कपाळ... डोन्ट वरी असं करा

## चेहऱ्याचं स्टायलिंग!

**सौंदर्याच्या मापदंडानुसार चेहऱ्याची ठेवण असणं म्हणजे दुर्मिळ गोष्ट! आपल्यापैकी प्रत्येकाच्या चेहऱ्यात काही तरी उणीव किंवा वेगळेपण असतंच. मोठं किंवा रूंद कपाळ हे त्यापैकीच एक. असं कपाळ असणं हे बुद्धिमत्तेचं लक्षण समजलं जात असलं, तरी ते चेहऱ्याच्या सौंदर्याला बाधा आणू शकतं. कपाळ खूप मोठं असेल, तर हेअरस्टाइलचीही विशेष काळजी घ्यावी लागते. असं कपाळ असणाऱ्यांनी चेहऱ्याचं स्टायलिंग नेमकं कसं करावं याच्या टिप्स...**



कोणतीही हेअरस्टाइल करताना केस मागे वळवू नका. पोनीटेल शक्यतो टाळाच. केस मागे वळवल्यानं चेहरा ओढल्यासारखा दिसतोच. शिवाय कपाळ आणखी मोठं दिसू लागतं. यामुळे हेअरलाइन हळूहळू मागे जाण्याची शक्यताही असते. भांग पाडून किंवा केसांच्या बटा थोड्या चेहऱ्यावर येतील अशी हेअरस्टाइल करा. हेडबँड्स, बंधाना, स्कार्फ आणि हॅट अशा ॲक्सेसरीजचा आवर्जून वापर करा. यामुळे तीच तीच हेअरस्टाइल करण्यानं आलेला कंटाळा जाईल आणि प्रसन्न वाटेल. कपड्याला कॉन्ट्रास्ट होतील अशा रंगाचे स्कार्फ स्टायलिश पद्धतीनं बांधता येतील. बंधाना ही तर सदैव लोकप्रिय असलेली फॅशन असल्यामुळे मोठं कपाळ लपवण्यासाठी तिचा चांगला वापर करता येईल. केस बऱ्यापैकी मोठे असतील, तर एखादी बट रंगवून तिच्याकडे लक्ष वेधता येईल. केस कलर करायचे नसतील, तर कृत्रिम बट बाजारात मिळते, तिचा वापर करता येईल. डोळ्यांचा उत्तम मेकअप ही मोठं कपाळ लपवण्यासाठीची सर्वात चांगली युक्ती आहे. त्यासाठी चेहरा आणि कपाळ यांच्या प्रमाणानुसार भुवया कोरून घ्या. आयब्रोज करताना त्याला टोक ठेवा. डोळ्यांचा चांगला मेकअप कसा करायचा याचं तंत्र शिकून घ्या. मेकअप चांगला असेल, तर पाहाणाऱ्याचं लक्ष मोठ्या कपाळाकडे न जाता डोळ्यांकडे जाईल. मोठ्या कपाळामुळे एकंदर चेहराही खूप मोठा वाटतो. तो तसा वाटू नये यासाठी योग्य हेअरकट करणं गरजेचं आहे. म्हणजे चेहऱ्यामध्ये एकप्रकारचा समतोल राखला जाईल. सरळसोट हेअरकट शक्यतो टाळा. केस दाट (व्हॉल्यूम) दिसतील, ते फुलतील (बाउन्स होतील) असा हेअरकट निवडा.

## ट्रान्सपरन्ट अनारकलीची स्टाइल

भरजरी अनारकलीची स्टाइल अजूनही इन आहेच. पण सध्या चलती आहे, ट्रान्सपरन्ट अनारकलीची. या ट्रान्सपरंट घेरामुळे चुडीदारवरचं वर्कही दिसून येतं आणि छान लूकही मिळतो.

फॅशनच्या बाबतीत बोलू तेवढं कमीच आहे. दररोज बाजारात एक नवी फॅशन दिसते. त्यातही कपड्यांच्या तऱ्हा तर पाहायलाच नकोत. सध्या लग्नसराईचा मोसम सुरू आहे. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांपैकी नव्वद जणींचा अनारकली सुट असतोच असतो. कॉटन अनारकली, वर्क्ड अनारकली, शरारा अनारकली, पेटलेट्स अनारकली, डबल घेर अनारकली असे विविध प्रकार यात पहायला मिळतात. त्यातच आता भर पडलीय, ट्रान्सपरंट अनारकलीची. सध्या हे ड्रेसेस टीव्ही, सिनेमाच्या तारकांवर झळकताना दिसले तरी लवकरच ते बाजारात दिसतील. या ड्रेसचा वरचा अर्धा भाग कॉटन, शिफॉन, वेलवेट अशा मटेरिअलचा असून त्यावर पूर्णतः वर्क केलेलं असतं. तर ड्रेसचा खालचा घेर संपूर्ण ट्रान्सपरंट असतो. या स्टाइलची खासियत म्हणजे त्याची सलवार प्लेन नसून, चुडीदार स्टाइलची मस्त भरीव वर्क केलेली असते. पायावरची ही डिझायनर चुडी उठून दिसावी म्हणूनच अनारकलीची घेर ट्रान्सपरंट ठेवला जातो. या पॅटर्नमध्ये क्रेप, सिल्क, वेलवेट, क्रश अशा मटेरिअल्सला जास्त मागणी आहे. ही फॅशन नवखी असली तरी अनेक मैत्रिणी त्याला पसंती देताना दिसताहेत. अनारकली ड्रेसइतकाच महत्त्वाचा असतो त्याचा चुडीदार. पण अनारकलीवर खूपच वर्क असल्याने पायावरची चुडी झाकली जाते. मग ती डिझायनर चुडी दिसण्यासाठी अनारकलीच्या टॉपमध्ये असा बदल करण्यात आला आहे.



## अनुष्काला आवडतात मुलांचे कपडे!

बॉलिवूडमध्ये कितीही स्पर्धा असली तरी अभिनेत्री अनुष्का शर्माला याची फिकीर नाही. फॅशनच्या बाबतीतही ती उगाच सगळे ट्रेंड फॉलो करायला जात नाही. मला मुलांसारखेच जीन्स-टी शर्ट घालायला आवडतं, असं ती सांगते. मला साधंसुधं रहायलाच आवडतं. उगाचच हा ट्रेंड फॉलो करा, त्याच्या मागे पळा असं मी करत नाही. माझ्यासाठी आवडीचे कपडे म्हणजे जीन्स-टीशर्ट, यात मी एकदम कम्फर्टेबल असते, अभिनेत्री अनुष्का शर्मा सांगते. गो स्लीवलेस या स्पर्धेच्या निमित्ताने अनुष्काने गप्पा मारल्या. कोणत्याही हिरोइनसाठी शॉपिंग हा वीक पॉइंट असला तरी अनुष्का त्याला अपवाद आहे. तिला स्वतःसाठी फारशी खरेदी करायला आवडत नाही. मला इतरांसाठी, विशेषतः भावासाठी खरेदी करायला खूप आवडतं, असं ती सांगते.

## मिस बॅगवती


**प्रत्येक ठिकाणी जाताना तुम्ही एकच बॅग वापरता, की गरजेनुसार वेगवेगळी बॅग वापरता. छोट्यात छोटी पर्स वापरता, की भलीमोठी झोळी... बॅगच्या प्रकारावरून स्वभावाचा अंदाज बांधता येतो हे तुम्हाला माहीत आहे का?**



- **टोटे बॅग : ही बॅग खांद्याला लटकवलेली असेल आणि तरीही सतत तिचा एक हात या बॅगेवरच असेल तर समजायचं की ही मुलगी हिच्या गोष्टींबद्दल खूप पझेसिव्ह आहे. तिला तिच्या गोष्टी जपायला खूप आवडतात. मोठ्ठी टोटे बॅग असेल तर समजायचं की हिच्या या भल्या मोठ्या बॅगमध्ये तिच्या लिपस्टिक, हँड सॅनिटायझर, टिश्यू, पाण्याची बाटली, पुस्तक असा सगळा जामानिमा असणार.**
- द स्लिंग बॅग : ही बॅग वापरणाऱ्या मुली एकदम हिप्पी स्टाइलच्या असतात. धम्माल- मस्ती करायला त्यांना जाम आवडते. कॉलेजच्या मुलींमध्ये अशा बॅग्ज विशेष लोकप्रिय आहेत.
- क्लच : क्लच वापरणाऱ्या पोरींचं सगळं कसं व्यवस्थित आणि जेवढ्यास तेवढं असतं. त्यांना कुठे किती सामान न्यायचंय याचा पक्का अंदाज असतो. त्यामुळेच त्या क्लचसारखी छोटीशी बॅग खूप आत्मविश्वासाने वापरतात.
- छोट्या बेल्टची बॅग : ज्या महिला अशी हातातली बॅग वापरतात त्या अत्यंत आत्मविश्वासू असतात. त्या व्यवसायही उत्तम रितीने सांभाळतात. आपण काय आहोत आणि आपल्याला काय करायचंय आणि आपण काय करतोय हे त्या पक्कं ओळखून असतात.
- वन साइडेड बॅग : तुम्ही वन साइडेड बॅग वापरता का? मग तुम्हाला नक्कीच मोकळं राहायला आवडत असणार. त्यातही तुम्ही जर काळा, तपकिरी अशा रंगाच्या बॅग्ज वापरत असाल तर तुम्ही साध्यासुध्या आहात. या बॅग्ज जर निऑन कलर्सच्या किंवा रंगीबेरंगी असतील तर ती मुलगी नक्कीच फॅशनची हौस असलेली, खट्याळ आणि बिनधास्त असली पाहिजे.

## सांभाळा शोभेच्या वस्तूंना

**घरात वेगळ्या शोभेच्या वस्तू ठेवण्यासाठी आपण अँटिक वस्तू घेतो. मात्र, त्यांची काळजी घेणं महत्त्वाचं असतं. त्यासाठीच काही टिप्स...**



- सहा महिन्यातून एकदा पेंटिंगचा कॅनव्हास आणि फ्रेम तपासून पाहावी. फ्रेम बदलता येत असेल, तर आवर्जून बदला.
- सुक्या आणि मऊसर कपड्यानं चित्राची फ्रेम रोज स्वच्छ करा. अँटिक वस्तू फक्त मऊसर कोरड्या कपड्यानंच साफ करा. अथवा मऊ धाग्यांचा टूथ ब्रश वापरा.
- सूर्याची किरणं जिथं पडतील, आग किंवा हिटरच्या ठिकाणी चित्रं आणि इतर अँटिक वस्तू ठेऊ नका.
- एखादी वस्तू ती पॅक करून ठेवताना विशेष काळजी घ्या. कापूस, बँडेज किंवा एखादा मऊसर कपड्यात ती आधी बांधून घ्या. मग त्यावर पेपर लावा. त्या आकाराचा बॉक्स मिळाला तर त्यात ठेवा.
- अन्यथा, प्लास्टिक किंवा कॉटनच्या पिशवीची व्यवस्था करा. यामुळे तिची चकाकी टिकून राहाते. बांधून ठेवली, तरी सहा महिन्यातून एकदा त्या वस्तूची तपासणी करा.

## घरातलं कापडी सौंदर्य!

**घराच्या सजावटीत अत्यंत कल्पकपणे केलेला कापडाचा वापर त्या घराच्या सौंदर्यात आणखी भर घालतो. हल्ली इंटेरिअर डिझायनिंग करताना ढोबळमानानं फक्त सोफा- बेड, टीव्ही असं फर्निचर आणि फ्रेम्स, लॅम्पशेड, फ्लॉवरपॉट अशा कलात्मक वस्तू घेतल्या जात नाहीत, तर विशिष्ट थीमनुसार सजावट केली जाते. त्या थीमला साजेसे रंग, वस्तू यांवर सखोल विचार करून सजावट केली जाते. सजावटीसाठी आजकाल विविध प्रकारची फॅब्रिक वापरली जाऊ लागली आहेत. फॅब्रिक वापरण्यामुळे घराला एक प्रकारचा एथनिक लूक येतो, शिवाय त्यातून घरात राहणाऱ्यांच्या कलादृष्टीचाही अंदाज येतो.**



### काय करता येईल?

- पूर्वी फॅब्रिकचा वापर बेडशीट, अभ्रे आणि पडदे यांच्यापुरता मर्यादित होता. आता अगदी भिंतींवरच्या फ्रेममध्येही फॅब्रिक वापरता येतं. सोफ्याचं कव्हर आणि कुशन्ससाठी कॉन्ट्रास्ट पद्धतीनं गडद रंग वापरता येतील. कुशन्सवर पॅचवर्क, मिरर वर्क करता येईल. खास प्रसंगांसाठी सिल्कचे कुशन्स वापरता येतील. या कुशन्सला गोंडे लावल्यास किंवा एम्ब्रॉयडरी केल्यास आणखी सुंदर दिसेल. एकच प्रकार ठेवायचा असेल, तर सिल्क आणि ब्रोकेड किंवा फॅब्रिक आणि लेदर असं कॉम्बिनेशन वापरता येईल.
- घरामधल्या छोट्या छोट्या वस्तूंमध्येही फॅब्रिकचा सहज वापर करता येईल. उदा. फोटो लावण्याची फ्रेम एखाद्या जरीकाठानं सुशोभित करता येईल. कुटुंबातील सर्वांचा एकत्र फोटो असल्यास त्याच्या फ्रेमला सोनेरी बॉर्डर्स, बीड्स, खडे, मिरर वर्क लावून सजवता येईल. याशिवाय वापरात नसलेल्या साडीचा भरजरी पदर फ्रेम करून भिंतीवर लावल्यास तोही छान दिसेल.
- टेबलामध्ये फॅब्रिकची एक थीम कायम ठेवता येईल. उदा. खुर्च्यांचं फॅब्रिक, नॅपकिन होल्डर, टेबल मॅट्स यासाठी एकाच प्रकारचं फॅब्रिक किंवा त्याच प्रकारच्या फॅब्रिकचे वेगळे रंग वापरून एकवाक्यता साधता येईल.
- बेडरूम, स्टडीरूम, गेस्टरूम अशा वेगवेगळ्या खोल्यांमधल्या फर्निशिंगला एक थीम देऊन तिथंही फॅब्रिकचा उत्तम वापर करता येईल. उदा. गेस्ट रूममध्ये सर्वांना आवडतील अशा न्यूट्रल रंगाचे पडदे, अवजड फर्निचरऐवजी सेटी किंवा टू- इन वन बेड ठेवता येईल. छोटंसं सेंटर टेबल ठेवून त्यावर खोलीच्या रंगाला साजेसा टेबलक्लॉथ वापरता येईल.
- तुमच्या बेडरूममध्ये बेडशीट, कुशन्स, वॉर्डरोब, पडदे, बाथरूम ॲक्सेसरीज यांसाठी वापरलेल्या फॅब्रिकमध्ये एक थीम ठेवा. त्यासाठी प्रसन्न रंग निवडा.



- स्टडी रूममध्ये फार भडक रंग वापरू नका. आरामात बसून वाचता येईल अशा विविध आकाराच्या खुर्च्या किंवा रेकलायनर्स घ्या. त्यांचं फॅब्रिक शक्यतो बेज, मस्टर्ड, फिकट विटकरी अशा रंगांमधून निवडा. लॅम्पशेडसाठी फॅब्रिकचा कल्पक वापर करता येईल.

## दागिन्यांची देखभाल



**मुलींना दागिने घेण्याची भारी हौस. नानाप्रकारचे दागिने त्यांच्याकडे असतात. मात्र त्यांची चमक दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी व्यवस्थित देखभाल करणंही गरजेचं आहे. मग ते सोनं असो, मोती असो, डायमंड असो किंवा इतर खड्यांचे दागिने असोत. त्यांच्या देखभालीसाठी ठरलेलं असं तंत्र आहे. त्याच्याच काही टिप्स...**

- डायमंड, खडे आणि मोत्यांच्या दागिन्यांना डबी किंवा कोणत्या पाकिटात ठेवताना कोंबून ठेऊ नका. ते मोकळे राहतील याची काळजी घ्या.
- खड्यांचे दागिने मऊ अशा कपड्याच्या पाकिटामध्येच ठेवा. तसंच, ते एकमेकांवर घासले जाणार नाहीत, याचीही काळजी घ्या. अन्यथा, त्याचं पॉलिश खराब होईल.
- खरेदी केले आणि कपाटात ठेवले, की झालं असं दागिन्यांचं नसतं. त्यांची योग्य ती स्वच्छता करावी लागते. धूळ, त्वचेचं तेल यामुळे त्यांचा चकचकीतपणा जाऊ शकतो.
- साबण आणि पाण्याच्या साहाय्यानं; पण हलक्या हातानं दागिने साफ केले पाहिजेत. यासाठी ज्या साबणामध्ये सोडा नसेल, असा सौम्य साबण वापरावा. नंतर, कॉटनच्या मुलायम कपड्यानं त्याला पुसून घ्या. एअर ड्राय आणि वेळोवेळी पॉलिश हेसुद्धा महत्त्वाचे टप्पे आहेत.
- दागिन्यातली कलाकुसर खूपच नाजूक असते. त्याच्यात बऱ्याच खाचाखळगाही असतात. त्या साफ करणं अनेकदा मुश्कील होऊन जातं. त्यासाठी सौम्य कंगोऱ्यांचा (ब्रिसल्स) टूथब्रश वापरता येईल. तसंच, अमोनिया आणि पाणी यांचं मिश्रणही याकामी येऊ शकतं.
- कोणत्याही दागिन्यांचं विशेषतः खड्यांच्या दागिन्यांचं सेटिंग तपासून घ्या. त्यातील खडे सराफानं व्यवस्थित बसवले आहेत, याची खातरजमा करून घ्या. पेंडंट वगैरे साखळीला जोडलं असल्यास त्याचं सेटिंग पाहून घ्या.



## शॉर्ट न्यूज

### लिंबाला प्रतिक्विंटल चार हजारांचा भाव

**नगर :** येथील दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीत लिंबाचे लिलाव झाले. यामध्ये एक नंबर लिंबाला चार हजारांचा प्रतिक्विंटलला भाव मिळाला. येथील बाजार समितीच्या आवारात १९.७५ क्विंटल लिंबाची आवक झाली. यामध्ये लिंबाला कमीत कमी दीड हजार व जास्तीत जास्त चार हजार रुपयांचा भाव मिळाला. लिंबाला सरासरी २७५० रुपयांचा भाव मिळाला. किरकोळ बाजारात लिंबाला ५० ते ७० रुपये भावाने विक्री होत आहे. मात्र बाजार समितीत मात्र कमी भाव मिळत आहे. सध्या लिंबाच्या भावात चढ-उतार सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### पूजा खेडकरच्या अडचणीत आणखी वाढ

**नगर :** नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करून आयएएस पदाचा लाभ मिळविणाऱ्या वादग्रस्त प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या वडील आणि आईच्या नावावरील मालमत्तांची माहिती द्यावी, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने राज्याच्या नोंदणी महानिरीक्षकांकडे केली आहे. त्यातून दोघांच्या नावावर असलेल्या मालमत्तांची एकत्रित माहिती गोळा करून प्रशासनाची समिती उत्पन्नाची मर्यादा ठरविणार आहे. खेडकर यांच्या मालमत्तांची चौकशी हा प्राप्तिकर विभागाच्या चौकशीचा भाग असल्याचे सांगण्यात येत आहे.

### सोनईच्या व्यक्तीचा नदीत मृतदेह आढळला

**सोनई :** येथील रमेश खंडुजी सुद्रिक (वय ५७) हे मंगळवारपासून बेपत्ता असल्याची तक्रार सोनई पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. प्रवरासंगम गोदावरी नदीत त्यांचा मृतदेह आढळून आला आहे. सुद्रिक हे सायंकाळी घरी न आल्याने कुटुंबीयांनी वडिलांच्या मित्रांना विचारपूस केली. प्रवरासंगम येथे गाडी असल्याची माहिती मिळाल्याने कुटुंबीयांनी तेथे धाव घेतली असता तेथे गाडी व जवळील साहित्य सापडले. गोदावरी नदीत मृतदेह सापडला असून नेवासा येथे शवविच्छेदन करण्यात आले.

### टाकळीभान टेलटँकमधून आवर्तन सोडावे

**श्रीरामपूर :** तालुक्यातील टाकळीभान परीसरातील विहीरी व कुपनलीकेने तळ गाठला असून शेतातील उभ्या पिकांना पाण्याची तीव्र टंचाई जाणवू लागली आहे. त्याचा फटका रब्बी हंगामी पिकांना बसत आहे. उभी पिके माना टाकू लागल्याने जलसंपदा विभागाने त्वरीत शेती सिंचनाचे आवर्तन टाकळीभान टेलटँकमधून सोडावे. अशी मागणी चारी नं १६ वरील लाभधारक शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी जलसंपदा विभाग श्रीरामपूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### प्रवासी भाडेवाढ मागे घेण्याची मागणी

**अकोले :** एसटी महामंडळाने केलेली प्रवासी भाडेवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशा आशयाचे निवेदन ग्राहक पंचायतीने तहसीलदारांना दिले आहे. अकोले सारख्या आदिवासी व डोंगराळ भागात अकोले परिवहन आगाराकडून प्रवाशी वर्गासाठी वेळेवर बस नसल्याने एस टी महामंडळाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दुसऱ्या बाजुला राज्य सरकारने प्रवाशी तिकिट भाडेवाढ केल्याने सर्वसामान्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. राज्य सरकारने भाडेवाढीचा निर्णय मागे घ्यावा अशी मागणी अकोले तालुका ग्राहक पंचायतीने तहसीलदारांना निवेदनातून केली आहे.

# न्यू हाय फाय मोबाइल शॉपीने जपली सामाजिक बांधिलकी

## पोलिस पाटील व पोलिस मित्रांना टॉर्च लाईटचे वाटप



**नारायणगाव : प्रतिनिधी**

**व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत येथील न्यू हाय फाय मोबाईल शॉपीच्या वतीने तालुक्यातील पोलिस पाटील व पोलिस मित्रांना टॉर्च लाईटचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाचे स्वागत होत आहे.**

नारायणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरी वा तत्सम प्रकार रोखण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस पाटील व पोलीस मित्र यांची नारायणगाव पोलीस ठाण्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा पोलीस उपाधीक्षक चौधर, आमदार शरद सोनावणे, मा. जिल्हा परिषद सदस्य आशाताई बुचके, सहायक पोलीस निरीक्षक शेलार, नारायणगावचे उपसरपंच योगेश ऊर्फ बाबू पाटे, वारुळवाडीचे सरपंच राजेंद्र मेहेर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीस ६४ पोलीस पाटील व शंभरावर पोलीस मित्र उपस्थित होते. या वेळी सामाजिक बांधिलकी जपत न्यू हाय फाय मोबाईल शॉपीच्या वतीने उपस्थित पोलीस पाटील व पोलीस मित्रांना मान्यवरांच्या हस्ते टॉर्च लाइटचे वाटप करण्यात आले.

# मायंबात वीस हजार भाविकांना महाप्रसाद

## चैतन्य नवनाथ भक्त सेवा मंडळाचा उपक्रम । मंदिराला आकर्षक सजावट

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**मायंबा येथील मच्छिंद्रनाथ यात्रेनिमित्त अहिल्यानगरच्या चैतन्य नवनाथ भक्त सेवा मंडळाच्या वतीने २० हजार नाथ भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले, त्यासाठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. मागील ३१ वर्षांपासून मंडळातर्फे श्रीक्षेत्र मायंबा येथे भंडारा (महाप्रसाद) कार्यक्रम होत आहे. नगरचे आदित्यनाथजी महाराज यांनी समाधीची विविध प्रकारची फळे आणि रंगीबेरंगी फुलांनी सजावट करण्यात आली होती.**



नाथ भक्तांच्या अभुतपूर्व गर्दीत हा भंडारा संपन्न झाला. उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. महाप्रसादाचा पंगतीत लाभ घेतला. तसेच आगडगावचे काळभैरवनाथ मंदिराचे विश्वस्त मंडळासह अनेक जण उपस्थित होते. त्यांनीही प्रसादाचा लाभ घेतला. नाथभक्तांना महाप्रसाद देण्यासाठी नाथसेवक व मुलांची टीम होती. भंडारा संपन्न होण्यासाठी मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्टचे सहकार्य लाभले. भंडाऱ्यासाठी सहकार्य करणाऱ्या नाथ भक्तांचे मंडळातर्फे आभार मानण्यात आले.

मायंबा येथे पहाटे नाथांच्या महाआरतीनंतर यात्रेस प्रारंभ झाला. नगर, नाशिक, पुणे, औरंगाबाद, लोणावळा, बीड, आष्टी, गंगापूर, ठाणे येथील भाविकांनी गर्दी केली होती. देवस्थान समितीतर्फे निवास व्यवस्था, पार्किंग, आरोग्य सुविधा पिण्याचे पाणी पुरवण्यात आले. यात्रेनिमित्त मच्छिंद्रनाथांच्या समाधी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने रात्री मंदिर खुलून दिसत होते. नगरच्या चैतन्य नवनाथ भक्तसेवा मंडळाच्या वतीने मंदिर व मंदिर परिसरात आकर्षक फुले व फुग्यांनी केलेली सजावट येणाऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत होती.

७०० किलो भरडा, ७०० किलो गूळ, ११ डबे तूप १०० किलोपासून चालू झालेला भंडारा आज ७०० किलो भरडा, ७०० किलो गुळ, ७०० किलो तांदुळ, ११ डबे गायीचे गावरान तूप व सांबरसाठी लागणाऱ्या डाळी, तेल, मसाले, इतर साहित्य, भाजीपाला असे २५०० किलोपर्यंत पोहोचला आहे. भंडाऱ्याकरीता २०० बाय २०० फुट मंडप उभारण्यात आला होता. त्यात पंगत व बुफे पद्धतीने जेवण देण्यात आले. बडेबाबा यांना मंडळाच्या वतीने ५६ भोग, मेदू वडा, आंबिल घुगऱ्या आणि सांबर, भात, लापशीच्या नैवेद्य दाखवण्यात आला.

# कट्टर विरोधकांनी घेतली गळाभेट !

## नाना पटोले आणि प्रफुल्ल पटेल एकाच मंचावर राजकीय वर्तुळात रंगली चर्चा

**भंडारा : प्रतिनिधी**

**भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव येथे शंकरपट शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमात राजकीय कट्टर विरोधक नेते एकाच मंचावर पाहायला मिळाले. काँग्रेस नेते नाना पटोले आणि अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल या दोघांनी गळाभेट देखील घेतली आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.**



भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्रात तसेच यातील येणारे सातही विधानसभा मतदारसंघात आपलेच वर्चस्व ठेवण्याचे प्रयत्न या दोन्ही नेत्यांकडून केले जातात. राजकीय व्यसपीठांवरून एकमेकांवर आरोप टीका करणारे प्रफुल्ल पटेल आणि नाना पटोले हे यावेळी एकाच मंचावर उपस्थित होते तसेच या दोघांमध्ये गप्पा देखील झाल्याचे पाहायला मिळाले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभांमध्ये बोलताना अनेकवेळा महाविकास आघाडीच सत्तेत येणार आणि मुख्यमंत्री पदावर नाना पटोले यांनी दावा देखील केला होता. आमगाव येथे भाषणात बोलताना नाना पटोले म्हणाले होते, राजकुमार पुराम याला आमदार बनवायचे आहे. नाही बनवलं तुम्ही तर महाराष्ट्रात नानाभाऊ उद्या काय बनणार आहे हे तुम्हाला माहीतच आहे. तुम्ही एक एक आमदार नाही दिले तर अडचण येणार आहे, असे म्हणत नाना पटोले यांनी मुख्यमंत्रिपदासाठी अप्रत्यक्ष होकार दिल्याचे दिसून आले होते.

नाना पटोले यांच्या या विधानवार प्रफुल्ल पटेल यांनी जोरदार पलटवार केला होता. ते म्हणाले होते, नाना पटोले हे स्वयंभू घोषित मुख्यमंत्री आहेत. अशा म्हणण्याने कुणी काही बनत नाही. महाराष्ट्रामध्ये तुमचे सरकार आले पाहिजे. असा पलटवार प्रफुल्ल पटेल यांनी केला होता. असे हे दोन्ही नेते एकमेकांचे कट्टर विरोधक असून देखील आज एकाच मंचावर दिसून आले. यावेळ त्यांच्यात झालेली गळाभेट देखील सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

# १९ रुग्णवाहिकांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते वाटप

## ११५ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर

**नगर : प्रतिनिधी**

**प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्राप्त झालेल्या १९ रुग्णवाहिकांचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.**




जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला आमदार मोनिका राजळे, अमोल खताळ, विठ्ठल लंघे, काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गुंजाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे आदी उपस्थित होते.

जिल्हा परिषद आरोग्य विभागाअंतर्गत एकूण ११५ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर आहेत. त्यापैकी १०२ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. सहसंचालक आरोग्य सेवा मुंबई कार्यालयाकडून जिल्ह्यासाठी कालबाह्य झालेल्या रुग्णवाहिकाच्या जागेवर १४ व ५ नवीन सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी, अशा एकूण १९ रुग्णवाहिका प्राप्त झाल्या आहेत. त्यासाठी ३ कोटी ४१ लाख ५ हजार रुपये खर्च करण्यात आला आहे.

वाचकांच्या लेखणीतून

# प्राचीन ग्रीस देशातील सामुदायिक विवाह



विवाह हे एक वर्तुळ आहे. जे बाहेर आहेत ते या वर्तुळात जाण्यासाठी आतुर असतात. जे त्या वर्तुळात अडकलेले असतात ते त्यातून बाहेर पडण्याची धडपड करीत असतात. असा एक किस्सा वाचनात आला होता. परंतु सामाजिकदृष्ट्या पाहता विवाह ही एक पवित्र संस्था आहे. प्रजावृध्दी आणि वंशसातत्य राहण्यासाठी ही संस्था आवश्यकच असते. त्यामुळे समाजाला स्थैर्यही प्राप्त होते.

अमर नावाच्या हिंदी चित्रपटात

अगर दुनिया चमन होती तो वीराने कहाँ जाते?

मुखड्याचे एक सुंदर गीत आहे. त्यात म्हटले आहे, सारे जग जर एक उद्यान असते तर वैराण वाळवंटांनी कुठे जायचे होते? त्याप्रमाणे जर साऱ्या दुनियेत केवळ सुंदर स्त्रियाच असत्या तर कुरूप (?) स्त्रियांनी कुठे जायचे होते?

डॉ राममनोहर लोहिया म्हणत असत, सगळ्या स्त्रिया सुंदरच असतात. फक्त दुसरी पहिलीपेक्षा कमी सुंदर असते एवढेच. त्यांच्या मते स्त्रीला कुरूप म्हणणे हा स्त्रीत्वाचा अपमान होय.

विवाह पध्दतीसंबंधी प्राचीन ग्रीस देशाच्या इतिहासात अजब उल्लेख सापडतो.

राज्यातील उपवर मुलींचे विवाह तत्कालीन सरकार समुदायिक पद्धतीने लावून देत असे. ज्या उपवर मुलाला जी मुलगी आवडली त्याला सरकारी तिजोरीमध्ये ठराविक रक्कम किंवा हुंडा भरावा लागे. राहता राहिला प्रश्न उरलेल्या उपवर (कमी सुंदर) मुलींचा. अशा उपवर मुलींशी जो उपवर मुलगा विवाह करण्यास तयार होईल त्याला सरकारी तिजोरीतून हुंडा म्हणून ठरावीक रक्कम मिळत असे. अशा तऱ्हेने सर्व मुलींचे विवाह सामुदायिक पद्धतीने संपन्न होत.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

(पान १ वरून)

### दोन दिवसांत मार्ग काढा, हात जोडून सांगतो !

निशाणा साधला. तुम्हाला अजून किती बळी पाहिजेत? असा सवाल जरांगे यांनी मुख्यमंत्र्यांना विचारला. वेगळ्या कारणासाठी दोन-चार जणांनी आत्महत्या केली, तर तुम्ही पुनवर्सन करतात. मराठा समाजाचे तरुण राजकारण नाही, तर भविष्य मागत आहेत. भविष्यासाठी हक्काचे आरक्षण मागत आहेत, तुम्ही ते देत नाहीत. तुम्ही माणुसकी शून्य झालात. तुम्ही मराठ्यांचे मुडदे पडू देऊ नका, असे ते म्हणाले. संयम सुटला तर मला महाराष्ट्रात वेगळे आंदोलन करावे लागले, असा इशाराही मनोज जरांगे यांनी सरकारला दिला. जातीच्या लेकरांपेक्षा आम्हाला मोठे काही नाही. तुम्हाला काही द्वेष, राग असेल, तर तो नंतर बघा. गोरगरिबांच्या लेकरांनी काय केले? असा सवालही त्यांनी केला.

**तरुणांचा आत्महत्येचे राजकारण करू नका**

ज्या मागण्या झाल्या, त्यांची पुढील दोन दिवसांत अंमलबजावणी करा. जाणूनबुजून तुम्ही काम करत नाहीत. तुम्ही फक्त देतो म्हणता आणि देत नाहीत, याचा अर्थ तुम्ही जाणूनबुजून मराठा तरुणांच्या आत्महत्येचे राजकारण करत आहात, असा गंभीर आरोप मनोज जरांगे यांनी केला. त्यांच्या बलिदानावर खेळू नका. तुम्ही तातडीने मागण्यांची अंमलबजावणी करा, ही विनंती करतो, असेही ते म्हणालेत.

**कराडजवळील पैसे एखाद्या मंत्र्याचे असतील**

मनोज जरांगे यांनी यावेळी संतोष देशमुख हत्या प्रकरणावरही भाष्य केले. देशमुखांची हत्या करणारी टोळी विचित्र आहे. ती टोळी संपलीच पाहिजे. फरार आरोपी कृष्णा आंधळेला यांनी पळवले, असे वाटत आहे. खंडणी मागणारी, खून करणारी, छेडछाड करणारी, घर बळकवणारी, जमीन बळकवणारी, अशा वेगवेगळ्या टोळ्या आहेत. या पैशांवर राजकारण करायला मजा वाटली. संपूर्ण संपत्ती एखाद्या मंत्र्याची आहे. वाल्मीक कराडला इतक्या पैशांचे काय करायचे? असे मनोज जरांगे म्हणाले

### पृथ्वीराज मोहोळ ६७ वा महाराष्ट्र केसरी

खूप मोठे आहे. तसेच या कुस्तीवर महेंद्र गायकवाडने आक्षेप घेतला आहे, यावर बोलताना पृथ्वीराज मोहोळ म्हणाला, संपूर्ण महाराष्ट्राने कुस्ती पाहिली आहे आणि मला वाटत नाही की कोणाचा आक्षेप असेल. महेंद्रने मैदान सोडले हे अत्यंत चुकीची गोष्ट झाली आहे. तो पण मोठा पैलवान आहे, मागच्या वर्षीचा उपमहाराष्ट्र केसरी आहे. तो मोठा पैलवान आहे.

सलग दुसऱ्या वर्षी महेंद्र गायकवाड महाराष्ट्र केसरीच्या अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला होता. अंतिम सामन्यात पृथ्वीराज मोहोळ हा महेंद्र गायकवाडवर भारी पडला आणि सामना जिंकला. महेंद्र गायकवाड याने निकालावर आक्षेप घेत मैदान सोडले. पंचांसोबत वाद झाल्यानंतर महेंद्र गायकवाड उघडा होऊन मैदानाबाहेर गेला.

या कुस्तीच्या सामन्यात पृथ्वीराज मोहोळने टाकलेले डाव यशस्वी ठरले. या डावात महेंद्र गायकवाड फसला आणि त्याने मैदान सोडले. पंचांच्या निर्णयावरही त्याने आक्षेप घेतला. दुसरीकडे, पृथ्वीराज मोहोळच्या विजयानंतर त्याच्या सहकाऱ्यांनी एकच जल्लोष केला आणि त्याला खांद्यावर घेऊन आखाड्यातच त्याची मिरवणूक काढली. पृथ्वीराज मोहोळ याने विजयानंतर आनंद व्यक्त केला. या विजयानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या हस्ते चांदीची गदा देऊन पृथ्वीराज मोहोळचा सन्मान केला. तसेच त्याला थार गाडी बक्षीस म्हणून देण्यात आली आहे.

पृथ्वीराज राक्षेने पंचाला लाथ मारल्याने हा प्रकार घडला आहे. पंचांचा निर्णय मान्य न झाल्याने शिवराज राक्षेने हे कृत्य केले. यावेळी दोन्ही मल्लांमध्ये काहीशी झटापटही झाल्याचे दिसून आले. या गोंधळानंतर पोलिसांनी मध्ये हस्तक्षेप केला. नंतर हे दोन्ही मल्ल व्यासपीठावर असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे गेले.

शिवराज राक्षे म्हणाले, आपण तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिंकू नये म्हणून आपल्यावर अन्याय करण्यात आला असा आरोप शिवराज राक्षेने केला. तो म्हणाला की, आपले दोन्ही खांदे टेकले नव्हते, पाठही टेकली नव्हती. तसे असेल तर स्वतः हार मानतो. आपल्याला पराभूत करण्यासाठी हे जाणूनबुजून करण्यात आले. त्यावर आपण रिव्ह्युची मागणी केली आहे. सामन्याचा व्हिडीओ पाहून त्यावर निर्णय द्यावा अशी मागणी आपण केली आहे.

शिवराज राक्षेच्या कोचनेही पंचांवर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, कुस्तीत दोन्ही खांदे टेकले असते तर शिवराज हारला असता. तसे असते तर मी स्वतः त्याला बाजूला नेले असते. पण पंचाच्या निर्णयावर अपील देणे गरजेचे होते. टीम रेफ्रीने स्क्रीनवरती पाहून निर्णय देणे गरजेचे होते. आम्हाला हा निर्णय मान्य नाही.

# जास्त वाचाल तेवढे अधिक प्रगल्भ व्हाल!

## ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांचे प्रतिपादन | पारनेर महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन



**पारनेर : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनो तुम्ही जेवढे जास्त वाचाल तेवढे अधिक प्रगल्भ बनत जाल. आपल्या आवती भोवती ज्ञानाच्या अनेक शाखा विस्तारलेल्या आहेत त्या विस्तारलेल्या शाखांमध्ये अधिक सखोल अशी माहिती जाणून घेण्याची क्षमता आपल्यामध्ये निर्माण करा असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ संपादक व साहित्यिक उत्तम कांबळे हे बोलत होते. कर्मवीर भाउराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के,जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी, खजिनदार अॅड. दिपलक्ष्मी म्हसे, ऋषिकेश खिलारी, डॉ. ऋत्विजा खिलारी, कार्याध्यक्ष डॉ. संजय गायकवाड, प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, डॉ. रवींद्र देशमुख, डॉ. संजय कोल्हे, सावकार काकडे, विद्याथ प्रतिनिधी योगिता तरडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### वाचनावर भर द्या

**महाविद्यालयाच्या समृध्द ग्रंथालयात विविध नाविन्यपूर्ण पुस्तके आहेत. विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या वाचनावर अधिक भर द्यायला हवा. वैविध्यपुर्ण विषयांचे वाचन केल्यास तुमची भाषा अधिक प्रगल्भ होईल. आज माहिती तंत्रज्ञान वेगाने वाढत असताना यश मिळवायचे असेल तर प्रचंड मेहनत घ्यायला हवी. कष्ट करायला हवेत. स्वतःवर विश्वास ठेवायला हवा आणि जीवनात यशस्वी व्हायला हवे.**

**अॅड दिपलक्ष्मी म्हस्के**
खजिनदार

### ज्ञानदानाची भाषा शिकण्याकडे लक्ष द्या

**राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर आज ज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञान यांचा उपयोग मोठया प्रमाणावर होताना दिसून येतो. त्यासाठी ज्ञानदानाची जी भाषा आहे ती भाषा शिकण्याकडे अधिक लक्ष द्या. साहित्याचे वाचन करताना अनुवाद, भाषांतर,चरित्र, आत्मचरित्र या साहित्य प्रकारांमधील वाचन अधिक वाढवा. जीवनाकडे आणि जगण्याकडे अणिक सकारात्मक पध्दतीने बघा. जेणेकरून आयुष्यात यशस्वी होण्यासाठी तुम्हाला चांगल्या उत्तम सहकाऱ्यांची साथ मिळेल आणि जीवनात तुम्ही सहज यशस्वी होऊ शकाल.**

**डॉ. ज्ञानदेव म्हस्के**
कुलगुरू

### दुष्काळी तालुक्यात शिक्षणाचे प्रमाण मोठे

**पारनेर हा दुष्काळी तालुका असल्याने तालुक्यात शिक्षणाचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे. पठार भागावरील विद्यार्थी अतिशय मनापासून शिक्षण घेतात व जिवन यशस्वी करून दाखवितात. जीवनात अधिकधिक पुढे जाऊन आपले व्यक्तिमत्व अधिक ठळक कसे बनेल आणि आपण समाजामध्ये एक जबाबदार नागरीक म्हणून सामाजाची आपल्या हातून सेवा कशी होईल याचा विचार विद्यार्थ्यांनी करायला हवा. उद्याचा भारत आपल्याला अधिक यशस्वी करायचा असेल तर चांगल्या विचारांची पेरणी आजच करायला शिका.**

**सिताराम खिलारी**
विश्वस्त

### गुणवान विद्यार्थी

**जिल्हा मराठा संस्थेच्या उत्तम मार्गदर्शनामुळे, प्रेरणेमुळे आणि महाविद्यालयातील सर्व सहकाऱ्यांमुळे आम्ही यशस्वी वाटचाल करत आहोत. महाविद्यालयातील विद्यार्थी अतिशय गुणवान, कष्ट करणारे, मेहनत घेणारे आणि जीवन यशस्वी करून जीवनात सफल होणार आहेत.**

**डॉ. लक्ष्मणराव मतकर,** प्राचार्य

यावेळी बोलताना कांबळे म्हणाले, जग बदलू शकते या गोष्टीवर सातत्याने विश्वास ठेवा. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर तुमच्यासमोर ध्येय असायलाच पाहिजे. जीवनात सतत चालत राहा, प्रयत्नशील रहा. जग हे कष्टकऱ्यांचे कामगारांचे, श्रम करणारांचे, परिश्रम घेणारांचे आणि आशावादी जीवन जगणारांचे आहे. म्हणूनच हे जग बदलू शकते यावर विश्वास ठेवा आणि आपले ध्येय आजच निश्चित करा असे आवाहन कांबळे यांनी यावेळी बोलताना केले.

कार्याध्यक्ष डॉ. संजय गायकवाड यांनी महाविद्यालयाचा यशस्वी आलेख, विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी, प्राध्यापकांनी मिळविलेले यश या संपूर्ण विषयांचा आलेख आपल्या अहवाल वाचनामध्ये सखोल पध्दतीने केला. विद्याथ प्रतिनिधी योगिता तारडे हिने विद्याथ जीवनात यशस्वी होण्यासाठी आम्ही कसे प्रयत्नशिल आहोत, महाविद्यालय आम्हाला पुढे जाण्यासाठी कशी प्रेरणा देते याविषयी विचार मांडले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य, उपप्राचार्य,अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष समन्वयक, सर्व शाखा प्रमुख, विभाग प्रमुख, सहकारी प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर सेवक वृंद, विद्याथ व विद्याथनींनी केले. उपप्रचार्य तुकाराम थोपटे यांनी आभार मानले. मराठी विभागप्रमुख डॉ. हरेश शेळके, प्रा. अशोक शिंदे व डॉ. माया लहारे यांनी सुत्रसंचलन केले.

# खेळामुळे नैराश्य दूर होते

## डॉ. एन.एस.चव्हाण यांचे प्रतिपादन



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**धकाधकीच्या जीवनामध्ये सुदृढ आरोग्यासाठी खेळांना विशेष महत्व असून प्रत्येकाने दररोज व्यायामाबरोबरच खेळाकडेही लक्ष दिले पाहिजे. खेळामुळे जीवनातील नैराश्य दूर होते असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. एन. एस. चव्हाण यांनी केले.**

पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असोसिएशनच्या वतीने अहिल्यानगर येथे साईदीप क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर जिल्हयात प्रथमच वैद्यकिय व्यवसायिकांसाठी प्रीमीयर क्रिकेट लीगचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील आठ संघांनी पहिल्या दिवशी सहभाग नोंदविला. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. चव्हाण व ज्येष्ठ पत्रकार सुधीर लंके यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी डॉ. चव्हाण हे बोलत होते. यावेळी प्रसिध्द शल्य चिकित्सक डॉ. हेमंत देशपांडे, फिजिशियन डॉ. सुनील जाधव, स्त्री रोग तज्ञ डॉ.अमित करडे आदी उपस्थित होते.

डॉक्टरांना त्यांच्या व्यस्त दिनक्रमातून उसंत मिळत नाही. त्याचा परिणाम आरोग्यावर होतो. तंदुरूस्त आरोग्यासाठी खेळ, व्यायाम आवष्यक असून डॉक्टरांसाठी पारनेर तालुक्याने पुढाकार घेऊन आयोजित केलेली ही स्पर्धा निश्चित कौतुकास्पद असल्याचे डॉ. चव्हाण म्हणाले.

पत्रकार सुधीर लंके म्हणाले, आताचे युग हे स्पर्धेचे असल्याने दैनंदिन कामकाजातून वेळ काढून खेळ खेळल्यास शारीरिक व मानसिक तंदुरूस्ती राहण्यास मदत होते. खेळातून एकमेकांविषयीचा सदभावना दृढ होते. त्यासाठी अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे आवष्यक असल्याचे लंके यांनी सांगितले.

पहिल्या दिवशी नगर इलेव्हन व पाथर्डी इलेव्हन हे दोन संघ उपांत्य फेरीत दाखल झाले. स्पर्धा संयोजनासाठी डॉ. भाऊसाहेब खिलारी, डॉ. सोमेश्वर आढाव, डॉ. संदीप तांबे, डॉ. संजय बांडे, डॉ. गणेश सांगळे, डॉ. विजय पुरी, डॉ. अजित लंके, डॉ. प्रदीप दाते, डॉ. नितीन रांधवन, डॉ. संदीप औटी, डॉ. मनिष खरमाळे, डॉ. अजय येणारे, गणेश गायकवाड, जय झावरे ,प्रसाद सोनावळे, सुधीर जाधव यांनी परीश्रम घेतले. स्पर्धेत सहभागी खेळाडूंना स्मृतीचिन्ह व संघटनेची बेटी बचाव बेटी पढाव ही पुस्तिका देण्यात आली.

# जयदिप कारखिले तालुकाध्यक्ष ; मंगेश पारखे कार्याध्यक्ष

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार महासंघ

**निघोज : प्रतिनिधी**



**राळेगण थेरपाळ येथील पत्रकार जयदिप कारखिले यांची अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार महासंघ पारनेर तालुका अध्यक्षपदी तसेच अळकुटी येथील पत्रकार मंगेश पारखे यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र अखिल भारतीय पत्रकार महासंघ जिल्हाध्यक्ष सतिष रासकर यांनी या पदाधिकाऱ्यांना दिले आहे.**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट कार्यालयातील सभागृहात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे होते. नूतन तालुकाध्यक्ष जयदीप कारखिले, नूतन कार्याध्यक्ष मंगेश पारखे यांचा यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद, पत्रकार विकास शेंडकर, योगेश खाडे, संदीप ईधाटे, रामचंद्र सुपेकर, सलीमभाई हवालदार, सोमनाथ गोपाळे, नितीन परंडवाल, संपत वैरागर, आनंद भुकन, संदीप ईधाटे, अविनाश भांबरे , रोहन उनवणे , सागर आतकर, जयसिंग हरेल आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.पत्रकार सलीमभाई हवालदार यांनी या बैठकीचे सूत्रसंचालन केले. शेवटी पत्रकार योगेश खाडे यांनी आभार मानले.

# अहिल्यादेवींचे कार्य तरूणांसाठी प्रेरणादायी

## अर्जुन भालेकर यांचे प्रतिपादन



**पारनेर : प्रतिनिधी**

**अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरूण पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या चरित्राचा अभ्यास करून जीवनात तसे आचरण केल्यास विद्यार्थी निश्चित यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीत असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर यांनी व्यक्त केला.**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहीती देणारा चित्ररथ प्रत्येक तालुक्यात फिरत आहे. पारनेर येथे हा रथ आल्यानंतर पारनेर नगरपंचायतीच्या वतीने रथाचे स्वागत करण्यात आले. त्यावेळी भालेकर यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलताना भालेकर म्हणाले, या चित्ररथासोबतच्या कलाकारांनी सादर केलेले पथनाटय, पोवाडा निश्चितच कौतुकास्पद आहे. जिल्हयातील शाळा, महाविद्यालयांमध्ये हा चित्ररथ जाणार असून अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कामाची माहीती या रथाच्या माध्यमातून देण्यात येत असल्याचे भालेकर म्हणाले.

यावेळी उपनगराध्यक्षा जायदा शेख, नगरसेविका सुरेखा भालेकर, विद्या कावरे, हिमानी नगरे, खादी ग्रामोद्योगच्या संचालिका शोभा शेलार, मंगल शिंदे, वैष्णवी भिसे, स्वप्नाली ठुबे, सिमा वाळेकर, पुष्पा कावरे, योगेश मते, बाळासाहेब मते, बाळासाहेब नगरे, भुषण शेलार, मधुकर साळवे, प्रणाम नगरे, संपत पवार, संदीप मते, विनोद गोळे, उध्दव भिसे, गणेश कावरे, अमित जाधव, धिरज महांडूळे, विवेक शिंदे, योगेश बुगे, मुकूंद ठुबे, गोपी काळभोर, चंद्रकांत गायकवाड, बबन चौरे, माउली काकडे, वैभव शेलार, संकेत भालेकर यांच्यासह पारनेर शहरातील नागरीक उपस्थित होते.

### उचित न्यायदान !

**अहिल्यादेवी होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिध्द होत्या. त्यांनी भारतभर अनेक ठिकाणी हिंदूंची मंदिरे बांधली. नदीघाट बांधले. इतकेच नव्हे तर नागरीकांना रोजगार निर्माण व्हावा यासाठी त्यांनी औद्योगिक धोरणाचा स्विकार केला. देशातील प्रसिध्द देवस्थानांचा त्यांनी जिर्णोध्दार केला. अनेक देवस्थानांच्या त्या आश्रयदात्या होत्या.**

**अर्जुन भालेकर**
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# श्री. समर्थच्या विद्यार्थ्यांकडून माहेर संस्थेत समाजसेवा

**सुपा : प्रतिनिधी**

**श्री.समर्थ अकॅडेमी संचालित श्री समर्थ पॉलिटेक्निक, म्हसणे फाटा येथील संगणक विभाग आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी यांनी शिरूर येथील माहेर संस्थेत पुस्तकदान आणि विविध मदत वस्तूंचे वाटप केले. माहेर संस्था ही अनाथ मुलांसाठी काम करणारी एक सामाजिक संस्था आहे. या संस्थेत दुर्लक्षित, अनाथ व वंचित मुलांना आश्रय, शिक्षण, आरोग्यसेवा आणि आत्मसन्मानाने जगण्यासाठी योग्य वातावरण पुरवले जाते. संस्थेचा उद्देश समाजातील अशा दुर्बल घटकांना आत्मनिर्भर बनवणे हा आहे.**



(छाया – शरद रसाळ, सुपा)

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी संस्थेतील मुलांसाठी शैक्षणिक सामग्री, दैनिक उपयोगाच्या वस्तू तसेच लहान मुलांसाठी एक अल्पोपाहाराचे आयोजन केले. या सामाजिक कार्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि आपल्या कृतीतून समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण केली. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तक आणि वस्तूंचे वाटपच केले नाही, तर संस्थेतील मुलांशी संवाद साधून त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या संवादातून मुलांना आधार आणि सहानुभूती मिळाली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीनिवडी जाणून घेतल्या, त्यांच्या सोबत वेळ घालवला.

विद्यार्थ्यांनी आपला अनुभव शेअर करताना सांगितले की, या भेटीतून त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती आपले कर्तव्य समजले. संस्थेतील मुलांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करून त्यांना आनंद देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

शिक्षकांनी संस्थेतील मुलांसोबत संवाद साधत त्यांना प्रेरित केले, तसेच विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याचे महत्त्व पटवून दिले. शिक्षकांनी संस्थेसाठी शैक्षणिक साहित्य आणि अन्य वस्तूंचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डी. डी. देसले यांचे विशेष मार्गदर्शन आणि पाठिंबा लाभला. संस्थेचे संचालक श्री कैलास गाडीलकर यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना या सामाजिक उपक्रमासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी नेहमीच अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. ज्यातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होईल. संस्थेच्या वतीने या उपकरमाचे कौतुक करण्यात आले. सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एस. एस. दरोडे आणि प्रा. एम. व्ही. जाधव यांनी प्रयत्न केले.

# प्राथमिक शिक्षक बँकेचा देशभर लौकिक!

## मंत्री जयकुमार गोरे यांचे गौरवोद्गार

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचा देशभर लौकिक असून सहकार क्षेत्रातील ही एक आदर्श संस्था असल्याचे गौरवोद्गार ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी काढले.**



**शिक्षक बँक पदाधिकारी व संचालकांचा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

प्राथमिक शिक्षक बँकेचे पदाधिकारी व संचालक मंडळाचा मंत्री गोरे यांच्या हस्ते गोंदवले, जि.सातारा येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी गुरूमाऊली मंडळाचे जिल्हाध्यक्ष सुरेश निवडूंगे यांनी सांगितले की, बँकेकडे १ हजार ५०४ कोटी रूपयांच्या ठेवी असून १ हजार १२७ कोटी रूपयांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. बँकेचा एनपीए शुन्य टक्के असून नियमितपणे कर्ज वितरण करण्यात येते. भक्कम आर्थिक स्थिती असलेल्या या बँकेची मंत्री गोरे यांनी प्रशंसा केली.

यावेळी संभाजीराव थोरात, रावसाहेब रोहोकले, बाळासाहेब झावरे, आबासाहेब जगताप, संजय कळमकर, आर.टी. साबळे, राजू रहाणे, विठ्ठल फुंदे, राजकुमार साळवे, प्रविण ठुबे, बाळासाहेब सालके, सुरेश निवडूंगे, चेअरमन बाळासाहेब सरोदे, व्हा. चेअरमन रमेश गोरे व संचालक मंडळ उपस्थित होते.

# पाल्यांच्या अभ्यासाकडे महिलांचे लक्ष हवे!

## आशा चेडे यांचे प्रतिपादन | किसान संकुलात हळदी कुंकू समारंभ

**पारनेर : प्रतिनिधी**



**शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा असून आपला पाल्य प्रत्येक क्षेत्रात निपुण होण्यासाठी महिलांनी त्यांच्या अभ्यासाकडे जाणीवपुर्वक लक्ष दिले पाहिजे असे मत किसान बहुउद्देशिय संस्थेच्या किसान स्कुल अॅण्ड कॉलेजच्या संचालिका आशा चेडे यांनी व्यक्त केले.**

किसान परिवाराच्या वतीने किसान संकुलात आयोजित करण्यात आलेल्या हळदी-कुंकू समारंभात चेडे यांनी उपस्थित महिलांशी अनौपचारिक संवाद साधला. यावेळी विविध क्षेत्रातील महिला उपास्थित होत्या.

चेडे म्हणाल्या, मकर संक्रांतीनिमित्त आयोजित करण्यात येणारा हळदी कुंकू समारंभ हा एक सामाजिक मेळावाच म्हणावा लागेल. या समारंभानिमित्त महिला एकत्र येउन विचारांचे आदान-प्रदान होते. अनेक सकारात्मक गोष्टींवर चर्चा होऊन त्यातून नवनिर्माणाच्या संकल्पना जन्म घेतात. त्यामुळे अशा समारंभांना हिंदू धर्म संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्व असल्याचे त्यांनी सांगितले.

चेडे पुढे म्हणाल्या, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण सुविधा मिळाव्यात यासाठी माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत चेडे यांच्या संकल्पनेतून किसान शैक्षणिक संकुल उभे राहिले. सीबीएसई अभ्यासक्रमाची सुविधा प्रथमच पारनेर तालुक्यात उपलब्ध झाल्याने बारावीनंतरच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी होऊन अनेक विद्यार्थी वैद्यकिय, अभियंता अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना दिसत आहेत. महिलांनी आपल्या पाल्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देतानाच त्यास कोणत्या क्षेत्रात आवड आहे याचेही त्यांनी अवलोकन केले पाहिजे असा सल्ला चेडे यांनी दिला.

### किसानची वाटचाल कौतुकास्पद

**किसान संकुल सुरू झाल्यानंतर अल्पावधीमध्ये या संस्थेने नावलौकीक कमविला आहे. विविध क्षेत्रात विद्यार्थी यश संपादन करत असून किसान संकुलाची वाटचाल कौतुकास्पद आहे. जिल्ह्यातील ठराविक शिक्षण संकुलांमध्ये या संस्थेचे नाव घेतले जात असून पारनेर तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे.**

**सुरेखा आबूज,** पालक

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com